## सुख म्हणजे नक्की काय असतं... रम्य आठवणी!!

शीतल पाटकर

---

मला सांगा, सुख म्हणजे नक्की काय असतं?
नातवंडा बरोबरचे क्षण, जे घर बसल्या मिळतं!

चिमुकल्यांची कल्पनाशक्ति किती अफाट असते, नाही? त्यांचे ते चिमणे, बोबडे निरागस बोल, त्यांचा तो भाबडेपणा आपल्या मनाला आनंद देतातच आणि कधी कधी खूप काही शिकवूनही जातात.

रायन, माझ्या मोठ्या मुलीचा, मेधाचा मुलगा, लहानपणापासून अतीशय चौकस बुद्धीचा. सारखे प्रश्न विचारून सगळ्यांना भंडावून सोडत असे. Why, where, when, how? सारखी आपली तोंडाची टकळी चालूच. तो अडीच-तीन वर्षाचा झाल्यावर मेधा त्याला स्वावलंबनाचे धडे शिकवण्यासाठी म्हणाली,
"Ryan, this is your baby toothbrush and this is your baby toothpaste." मग ब्रशवर पेस्ट कशी लावायची, दात कसे घासायचे, साफ कसे करायचे वगैरे वगैरे सांगू लागली. रायनचा पहिला प्रश्न,
"Mom, why are you making me to do all these things?"
"Because you are growing up now, you have to do certain things by yourself." मेधा म्हणाली.
मग रायनचा दुसरा प्रश्न, "Am I growing like my Dad?"
"Yes"
"Then, can I shave like my Dad?" रायनचा प्रश्न.
"No Ryan, not yet, you can start shaving when you will get beard like your Dad." मेधाचं शांतपणे उत्तर.
"Will Daddy share his shaving cream with me, then?"
"Hmmm, …well, …may be." मेधा खात्रीपूर्वक सांगू शकत नव्हती.
रायन म्हणाला, "ओके". संपले बाबा एकदाचे ह्याचे प्रश्न, असा मेधा विचार करत असतानाच रायनचा धाडकन् पुढचा प्रश्न,
"But Mom, where is my 'baby shaving cream' now?".... आता काय उत्तर देणार मेधा?

रायनला वाचनाची खूप आवड होती, अजूनही आहे. अगदी बालपणापासून त्याला मेधा, ख्रिस किंवा मी गोष्टीची पुस्तकं वाचून दाखवत असू. एखादा नवीन शब्द आला की तो त्याचा अर्थ विचारायचा आणि लगेच त्या शब्दाचा छोट्या छोट्या वाक्यामध्ये उपयोग करायचा. एकदा आमच्या वाचण्यामध्ये 'fled' हा शब्द आला. त्या शब्दाचा अर्थ तो विचारू लागला. मी त्याला त्याचा अर्थ सांगताच तो खुर्चीवरून उतरून खोलीच्या बाहेर पळू लागला. मी विचारले, "अरे रायन, कुठे चाललास?" तर तो म्हणतो कसा "I fled the room, आजी." पुस्तकातल्या सर्व गोष्टी त्याला तोंडपाठ होत्या. कुठलं वाक्य कुठल्या पानावर आहे हेही त्याला बरोबर माहित असायचं. वाचता येत नसतानाही तो पुस्तक हातात धरून असा काही वाचण्याचा आव आणायचा की बघणाऱ्याला वाटावं 'अरे, हा अडीच-तीन वर्षाचा मुलगा इतकं छान वाचू शकतो?'

रायनला वन्य प्राण्यांची बरीच माहिती होती. पण त्याचा विशेष लाडका होता डायनोसोर्स. तीन वर्षाच्या ह्या मुलाची निरीक्षण शक्ति इतकी विलक्षण की डायनोसोर्सचे वेगवेगळे प्रकारः ब्रॅकीओसोरस, मॅमेंचीसोरस, टायरॅनोसोरस रेक्स असे आणि यापेक्षाही कठीण उच्चार असलेले डायनोसोर्स तो बरोबर ओळखून सांगायचा. त्याचे उच्चारसुद्धा अगदी स्पष्ट. डायनोसोर्सच्या जाती-पोटजाती, त्यांचे आकार, त्यांचे खाणे पिणे, इतकेच नव्हे तर अमुक एक डायनोसोर कुठल्या काळातला वगैरे वगैरे तो अगदी अचूक सांगायचा. आणि मग चेहऱ्यावर असा काही आर्विभाव आणत सांगायचा की तो शिक्षक आणि मी त्याची विद्यार्थिनी! "You know Aaji, it is divided into three time periods in which the dinosaurs lived: Triassic, Jurassic, and Cretaceous."

त्याचं वागणं मात्र अगदी निरागस! त्याच्या निरागसपणाचा एक किस्सा आठवतो. मी दररोज आंघोळ झाल्यावर देवाजवळ दिवा लावून प्रार्थना म्हणत असे. रायनही माझ्याजवळ उभा राहून हात जोडून, डोळे मिटून काहीतरी तोंडातल्या तोंडात पुटपुटत असे. आणि शेवटी माझ्याबरोबर "ॐ शांती शांती शांतीः" असं म्हणत असे. एकदा आम्ही सर्वजण वॉशिंग्टन डी सी मध्ये थॉमस जेफर्सन मेमोरियल बघायला गेलो होतो. जवळच असलेल्या एका म्युझियममधून डायनोसोरचं एक stuffed खेळणं मेधाने त्याच्यासाठी विकत घेतलं. स्वारी एकदम खूश! ते खेळणं हातात नाचवत आमच्याबरोबर बागेत मजेत बागडत असताना त्याला जेफर्सनचा भव्य पुतळा दिसला. लगेच त्याने ते खेळणं माझ्या हातात कोंबलं आणि पुतळ्यासमोर हात जोडून उभा राहून डोळे मिटून म्हणाला "ॐ शांती शांती शांतीः" आम्हाला सर्वांना हसू आवरेना.

रायनला carsच खूप आकर्षण होतं. रस्त्यावरून धावणारी प्रत्येक गाडी कोणती, model कुठलं, कुठच्या makeची वगैरे तो अचूक ओळखायचा. त्याची सर्वात favorite car म्हणजे Camry. तो म्हणायचा, "I want to buy Camry for myself when I grow up." एकदा आम्ही असेच कुठेतरी चाललो होतो. एका सिग्नलजवळ आमची गाडी थांबलेली असताना एक छानशी पॉश गाडी आमच्या बाजूला येऊन उभी राहीली. ती बघून रायन म्हणाला, "Aaji, I want to buy this car when I grow up." मी बघितलं, ती Camry नव्हती, दुसरीच कुठलीतरी गाडी होती. मी म्हणाले, "अरे, तू Camry घेणार होतास ना तुझ्यासाठी?" "Yes Aaji, this is for my wife!" त्याचं हजरजबाबी उत्तर! तीन वर्षाचा मुलगा तेव्हापासूनच आपल्या बायकोचा विचार करत होता!...... आत्ता रायन सोळा वर्षांचा आहे. त्याच्या डॅडीची Lexus कार अगदी खुबीने चालवताना बघून खूप धन्यता वाटते.

त्याच्या इतर अनेक ॲक्टीविटीज्मध्ये त्याचा सर्वात आवडता छंद म्हणजे बुद्धिबळ खेळणे. त्याने आपल्या डॅडीबरोबर चेस क्लबही सुरू केला होता. मला सांगायला अतिशय अभिमान वाटतो की तो नऊ वर्षाचा असताना म्हणजे मार्च २०१२ मध्ये वॉशिंग्टन डी सी ला scholastic and collegiate स्तरावर झालेल्या चेस टुर्नामेंट मध्ये त्याने हिस्सा घेतला होता. आणि त्याच्या लेव्हलच्या (Third Grade) सेक्शनमध्ये १७३ स्पर्धकांमधून सहा गेम्स मध्ये ४.५ पॉइंटस् मिळवून तो जिंकला व सबंध टुर्नामेंटमध्ये २२वे स्थान पटकावून तो एक शानदार ट्रॉफी जिंकून आला.

रेचल बरीचशी बोबडकांदा होती. रायनला 'यायन' म्हणायची. स्वतःच नाव ती 'येचल' असं सांगायची. 'Ring Around the Rosie' ही कविता जेव्हा ती म्हणायची तेव्हा छान गंमत वाटायची. तिच्या डॅडीने एकदा तिला हवं असलेलं खेळणं आणून दिलं. खुश होऊन ती म्हणाली, "Thank you Dad. I am so yucky!!" तिच्या बोबडेपणामुळे 'ल' चा 'य' झाला होता!

रेचलला सुद्धा रात्री झोपताना गोष्ट ऐकत झोपायची सवय होती. रोज हिला आता कोणती गोष्ट सांगावी बरं, असा प्रश्न पडायचा. एकदा मी तिला दोन मांजरी एका लोण्याच्या गोळ्यासाठी कश्या भांडतात आणि मग एक माकड येऊन त्यांना कसं गंडवतो, ही गोष्ट सांगत होते. शेवटी सांगितलं, "so, moral of the story is, 'two argue and a third benefits'!" 'दोघांचं भांडण, तिसऱ्याचा लाभ!' त्यावर रेचल लगेच म्हणते कशी, ''No Aaji, the moral of the story is, do not trust a stranger, solve the problem between yourselves!" किती समर्पक उत्तर होतं तिचं, नाही का?

रेचलचं आणि तिच्या मावशीचं छान जमत असे. मावशी आली की तिच्याबरोबर हिची दंगामस्ती सुरू. अनुप्रिता जेव्हा आरोहीच्या वेळेला गरोदर होती तेव्हा मेधा रेचलला म्हणाली, "Rachel, now don't trouble Mavashi ok, she has Baby in her tummy." … Baby in her tummy? रेचलला बोध नाही झाला. तिच्या प्रश्नात्मक चेहऱ्याकडे बघून मेधा म्हणाली, "तू जेव्हा अगदी छोटं बाळ होतीस ना, तेव्हा तू सुध्दा माझ्या पोटात होतीस आणि मग एके दिवशी म्हणजे २६ सप्टेम्बरच्या दिवशी तू बाहेर आलीस." त्याबरोबर रेचल जोरजोरात रडत रडत म्हणाली, "तू मला कां खाल्लस मम्मी?"

आरोही, अनुप्रिताची मुलगी, किती गोंडस आणि निरागस ! तिचं बोबडं बोलणं, घरभर बागडणं, सगळच लोभसवाणं, जीव लावणारं! अनुप्रिताच्या फॅमिली रूमच्या खिडकीतून सकाळी घरात छान ऊन येतं. ते ऊन चिमुकली आरोही आपल्या चिमुकल्या मुठीत पकडून जमिनीवर टाकल्याचा आविर्भाव करायची आणि म्हणायची, "Catch it and drop it!" जणू काही तिने पकडून आणल्यामुळेच ऊन घरात येतं!

एक गंमतीशीर आठवण! तिच्या 'Old Macdonald' च्या farm मध्ये गाई-घोडे-डुकरांबरोबर घरांतल्या सर्वांची हजेरी लागत असे. मला ती आमम्मा म्हणते. मला अधून मधून 'हरेराम' म्हणायची सवय आहे. तिच्या Old Macdonald poem मध्ये जेव्हा माझा नंबर लागायचा, तेव्हा ती म्हणायची, "... ... and on his farm, he had आमम्मा E-I-E-I-O. With हरेराम here and हरेराम there, हरेराम हरेराम everywhere हरेराम! Old Macdonald had a farm ... ...! आणि मग जोर जोरात खिदळत हसायची.

रेचल आणि आरोही दोघींनाही नृत्य व संगीत मध्ये छान रुची आहे. रेचल Ballet, Jazz, Hip-hop, Tap dance मध्ये निपूण आहे तर आरोही कथ्थक नृत्यामध्ये प्रवीण आहे. दोघींनीही अनेक trophies and awards मिळवले आहेत. आता ही नऊ वर्षाची आरोही Taekwondo black-belt holder आहे. मुलांची अशी उत्तरोत्तर प्रगति बघून अतिशय धन्य वाटतं.

लहान मुलांना अहंभाव (ego) अजिबात शिवलेला नसतो. मी-तू पणाची भावना नसते. तुझं-माझं असा दुजाभाव नसतो. मला आठवतंय, आरोही दोन सव्वादोन वर्षाची असताना तिला स्वतःला काही हवे असेल तर ती म्हणायची, 'आरोहीला हवे', किंवा 'आरोही बसते', 'आरोही गाणं म्हणते' वगैरे वगैरे. 'मी म्हणू गाणं' म्हणजे 'आमम्मा, तू म्हण गाणं'. 'तुला धरू' म्हणजे 'तू मला धर.' पण मग काही दिवसांनी ही भोळी भाबडी मुलं सुद्धा आपल्यासारखं 'मी-माझं', 'तू-तुझं' करायला लागतात. पण हे सर्व

‘माझं-तुझं’ करायला आपणच मुलांना शिकवत असतो ना? खरं म्हणजे ह्या निरागस बालकांकडून आपल्यालाच शिकण्यासारखं खूप आहे, नाही का?

तिन्ही नातवंडं आता मोठी झाली आहेत. आपआपल्या विश्वात रमली आहेत. पण प्रेमाचा ओलावा तसाच कायम आहे. अजूनही तेव्हढाच जीव लावतात. त्यांच्या बालपणातल्या रम्य आठवणी अजूनही ताज्याच आहेत.

आता आयुष्याच्या ह्या उंबरठ्यावर संध्याछाया वावरू लागल्या आहेत. मेधाच्या घराच्या पाठीमागच्या डेकवर संध्याकाळच्या वेळेला मी उभी राहून बघते...

झाडांच्या सावल्यांमधून संधीप्रकाश झिरपतो
अलगद उतरतो, हलकेच पसरतो
गर्द पाचूच्या हिरवळीवरती हळूवारपणे जिरतो!

काय बरं सांगत असेल हा संधीप्रकाश? परतीची आता वेळ झाली असंच काहीसं सुचवत असेल का? असेलही, पण झाडांच्या सावल्यामधून झिरपणारा संधीप्रकाश अलगदपणे उतरून गर्द पाचूच्या हिरवळीवर जेव्हा हळूवारपणे जिरतो ते पाहताना जी सुखद अनुभूती मिळते, ती खरच विलक्षण विलोभनीय असते, मन प्रसन्न करणारी असते. तोच आनंद, तोच सुखद अनुभव नातवंडांच्या सहवासातून मिळतो. आणि मग खरच संध्याछायेची भिती वाटतच नाही उलट जगण्यासाठी नवी उमेद निर्माण होते आणि मग गुणगुणावसं वाटतं,

मला सांगा, सुख म्हणजे नक्की काय असतं?
नातवंडा बरोबरचे क्षण, जे घर बसल्या मिळतं!

माझ्या चिमुकल्या चिमण्या मित्रांनो, असेच चिवचिवत रहा, किलबिल गोष्टी करत रहा, सदा हसत रहा, फुलत रहा आणि आम्हा सर्वांना असाच आनंद देत रहा!

---------------------------------------------------------------------------------------------------------

शीतल पाटकर
sheetalpatkar@hotmail.com
Address: 5206 Blossom Hill Drive,
Haymarket, VA 20169, US
Phone #: 703 659 7613